महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website :- www.doa.maharashtra.gov.in Email:- dirdoa.mum-mah@gov.in/ directorateofart@gmail.com

क्रमांक - डिओअे/२०२४/चार/९५४

दिनांक: २८.०३.२०२४

प्रति,

१. अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४. प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला संस्था. (सर्व)

विषय:- उच्चकला परीक्षा २०२४
परीक्षा शुल्काबाबत.

संदर्भ:- १. निरीक्षक चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. निचिशि/प्र.लि.-२/२०२३/२२७ दि. १८/०५/२०२३
२. कला संचालनालयाचे पत्र क्र. डिओअे-२०२३/दोन/१९८३ दि. २१/०७/२०२३
३. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०२३/प्र.क्र.३६/म-७ दि. ३१/१०/२०२३
४. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३६/म-७ दि. १०/११/२०२३
५. क्र. डिओअे/२०२४/चार/६१५ दि. २८/०२/२०२४
६. क्र. डिओअे/२०२४/चार/६६७ दि. ०४/०३/२०२४
७. क्र. डिओअे/२०२४/चार/७२० दि. ११/०३/२०२४

शैक्षणिक सत्र २०२३-२४ (पदविका अभ्यासक्रम) सत्रारंभ, दिर्घसुट्टया व सत्र समाप्तीबाबत संदर्भिय क्र. १ वरील निरीक्षक चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पत्रानुसार तसेच प्रवेश प्रक्रीयेबाबतच्या महत्त्वाच्या सूचनांबाबत संदर्भिय क्र. २ वरील पत्रान्वये शासकीय व शासनमान्य अशासकीय कला संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश देण्यात आलेल्या व परीक्षेस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भिय क्र. ५ वरील परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे, नोंदणीकृत विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने दिनांक २७.०३.२०२४ पर्यंत जमा करण्याबाबत संदर्भिय क्र. ७ वरील परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करणेबाबत महसूल व वन विभागाच्या संदर्भिय क्र. ३ व समक्रमांकाच्या संदर्भिय क्र. ४ वरील शासन निर्णयानुसार दुष्काळ घोषित करण्यात आलेल्या तालुक्यामध्ये शासन निर्णयात नमूद केलेल्या ८ सवलती लागू करण्यास शासनाची मान्यता दिली आहे. त्यापैकी क्र. ५ वरील सवलतीनुसार विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी करीता शासन मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयानुसार कला संस्थांकडून विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीबाबत मागणी करण्यात येत आहे.

संदर्भिय क्र. ३ व ४ वरील शासन निर्णयानुसार परीक्षा शुल्क माफीकरिता पात्र असलेल्या व ऑनलाईन फी भरणा केलेल्या विद्यार्थ्यांची सोबतच्या विवरणपत्रात तपशीलवार माहिती संचालनालयास सादर करावी. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर फी माफीस पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरणा केलेले शुल्क परत करण्यात येईल. तसेच, परीक्षा शुल्क माफीकरिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षा साहित्यासाठी होणारा खर्च ( परीक्षा शुल्काच्या ३० टक्के) कला संस्थांनी करावयाचा असून त्याबाबतची देयके, रद्द धनादेशासह या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर रक्कम प्रदानाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

उच्चकला परीक्षेस पात्र असलेल्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय परीक्षा शुल्क दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत ऑनलाईन भरणा करता येईल.

(राजीव मिश्रा)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ
तथा प्र.संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,
निवड नस्ती.

## उच्चकला परीक्षा २०२४

महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०२३/प्र.क्र.३६/म-७ दि. ३१/१०/२०२३ व समक्रमांकाच्या दि. १०/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफीकरिता अभ्यासक्रमनिहाय पात्र विद्यार्थ्यांची माहिती.

कला संस्थेचे नाव :

अभ्यासक्रम :

| परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या पात्र विद्यार्थ्यांची एकुण संख्या | ऑनलाईन भरणा केलेले एकुण परीक्षा शुल्क (रक्कम रु.) | परीक्षा शुल्कात माफीकरिता पात्र विद्यार्थ्यांची संख्या | परीक्षा शुल्कात माफीकरिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परत करावयाचे एकुण शुल्क (रक्कम रु.) | परीक्षा शुल्क माफ केलेले विद्यार्थी वगळून उर्वरित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क (रक्कम रु.) (२-४) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ ** | ४ | ५ |
| | | | | |

** रकाना क्र. ३ नुसार सवलतीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडली आहे.

(प्राचार्यांची स्वाक्षरी)

प्राचार्यांचे संपूर्ण नाव-------------------------------

शिक्का